# विद्यावार्ता®

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

SPECIAL ISSUE-2020 01

Peer Reviewed International Refereed Research Journal






शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम व
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
यांच्या संयुक्त विद्यमाने

## ''राजर्षी शाहू, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान '' या विषयावर

## एक दिवसीय राष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद

प्राचार्य
डॉ.श्रीकृष्ण चंदनशिव



25) देवदासी स्त्री : फुले, शाहू, आंबेडकर आणि प्रासंगिकता
**प्रा. गायत्री सोपान गाडेकर, अंबाजोगाई** ||90

26) फुले, शाहू, आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार
**प्रा. डॉ. गजानन बाबुराव मरगीळ, परभणी** ||96

27) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाहीबाबतचे विचार : एक चिकित्सक अभ्यास
**डॉ. विशाल रामहरी जाधव, परंडा** ||98

28) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्रियाविषयक दृष्टिकोन
**प्रा. डॉ. पी. व्ही. माने, लोहारा** ||100

29) राजर्षी शाहू महाराज यांच्या स्त्रीमुक्ती चळवळीचे ऐतिहासिक अवलोकन
**प्रा.डॉ. सोमवंशी एस. आर., उदगीर** ||102

30) महात्मा जोतिबा फुले यांचे शेतीविषयक विचार
**प्रा. जाधवर शशिकांत श्रीरंग, कळंब** ||105

31) फुले, शाहू, आंबेडकर यांचे स्त्रीविषक विचार
**केरले भास्कर रणजित, नांदेड** ||108

32) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकिय विचार व कार्य: एक अभ्यास
**प्रा. गायकवाड पी. के., लोहारा** ||112

33) शाहू, फुले, आंबेडकर यांचे सामाजिक विचार
**डॉ. व्हि. डी. आचार्य, लोहारा** ||114

34) आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीमध्ये फुले, शाहू, आंबेडकरांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान
**प्रा.गायकवाड प्रेमचंद गुंडू, जि.सोलापूर** ||117

35) शाहू, फुले व आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार
**प्रा. नाना त्र्यंबक घुगे, नाशिक** ||121

36) छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक विचार
**प्रा.डॉ. बेरळीकर प्रमोद बालाजीराव, उस्मानाबाद** ||127

37) शाहु महाराजाचे जलव्यवस्थापन यावरील विचार...
**प्रा. चित्रा दिगंबर साळुंखे, नाशिक** ||130

www.vidyawarta.com/03 — http://www.printingarea.blogspot.com

36

# छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक विचार

प्रा.डॉ. बेरळीकर प्रमोद बालाजीराव
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभागप्रमुख,
व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद

**********

**प्रास्ताविक :-**

छत्रपती शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कागलच्या जहागीदार घाटगे घराण्यातील जयसिंगराव आणि राधाबाई या दांपत्याच्या पोटी झाला. छत्रपती शाहू महाराजांना २ एप्रिल १८९४ रोजी राज्याधिकार प्राप्त झाला. महाराष्ट्रातील करवीर तथा कोल्हापूर छत्रपती राजर्षी शाहू महाराज संस्थानचे प्रागतिक अधिकारी अधिपती आणि थोर समाजसुधारक होते. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी आर्थिक विचाराची मांडणी व उभारणी केली.

सामाजिक सुधारणांबरोबरच शाहूंनी शेती व उद्योग धंद्याची उभारणी केली. आपल्या संस्थानात अनेक कृषी व औद्योगिक प्रदर्शने भरवली. पन्हाळ्यावर चहा, कॉफी, रबर यांच्या लागवडीचे प्रयोग केले. कृषी उत्पादनासाठी शाहूपुरी, जयसिंगपूर यासारख्या बाजारपेठा बसवल्या त्यामुळे कोल्हापूर ही गुळाची बाजारपेठ म्हणून देशात प्रसिध्द पावली. शाहूंनी कोल्हापूरात कारखानदारीचा पाया रचला 'शाहू मिल' ची स्थापना करून आधुनिक वस्त्रोद्योगास त्यांनी चालना दिली. शाहूंनी बांधलेले राधानगरीचे धरण कृषी क्षेत्रात संस्थानचा कायापालट करणारा उपक्रम ठरला. या धरणामुळे संस्थान सुजलाम्-सुफलाम करून टाकले. शाहूंनी सन १९१३ ला सहाकरी संस्थांचा कायदा पारित करून सहकारी चळवळीची मुहूर्तमेढ रोवली. आधुनिक शेती आणि औद्योगिक विकासाला त्यांनी महत्व दिले. मोठी-मोठी धरणे बांधली तर शेतीचा विकास होईल असे त्यांचे मत होते. शेतकरी वर्गाला व कामगार वर्गाला आर्थिक साह्य करणे यावर त्यांचा विश्वास होता. त्यांच्या कार्यप्रणालीमुळे त्यांना हिंदुस्थानातील हरितक्रांतीचे अग्रदूत म्हणतात.

**शोधनिबंधाच्या अभ्याचे उद्देश :-**

'छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक विचार' या शोधनिबंधाच्या अभ्यासाचे उद्देश पुढील प्रमाणे आहेत.

१. राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक विचारांचा अभ्यास करणे.

२. राजर्षी शाहू महाजांचे आर्थिक विचार आजच्या परिस्थितीतही उपयुक्त आहेत त्याचे विश्लेषण करणे.

३. राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक विचारांची आजही अंमलबजावणी झाली तर शेतकरी व कामगारवर्गाची आर्थिक स्थितीत सुधारणा होते हे स्पष्ट करणे.

**अभ्यास पध्दत :-**

'छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक विचार' हा शोधनिबंध लिहिण्यासाठी द्वितीयक साधन सामग्री व विश्लेषणात्मक पध्दत वापरली आहे. प्रस्तूत विषयावरील पुस्तके, संदर्भग्रंथ, मासिके, त्रैमासिके विविध ठिकाणी प्रकाशित स्वरूपातील माहिती डॉ.जयसिंगराव पवार यांनी संपादन केलेला राजर्षी शाहू स्मारक ग्रंथाच्या आधारे हा शोधनिबंध लिहिला आहे.

**गृहितके :-**

'छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक विचार' हा शोधनिबंध लिहिण्यासाठी पुढील गृहितके गृहित धरली आहेत.

१. शाहू महाराजांनी मांडलेले आर्थिक विचार आजही उपयुक्त आहेत.

२. राधानगरी सारखे धरणे बांधल्यामुळे करवीर (कोल्हापूर) संस्थाच्या कृषी उत्पादनात भरघोस वाढ झालेली आहे अशी धरणे आज विविध ठिकाणी बांधली तर शेती क्षेत्राला मुबलक पाणी पुरवठा प्राप्त होऊन कृषी उत्पादनात वाढ होऊ शकते.

३. छत्रपती शाहू महाराजांनी कृषी विकासाबरोबरच औद्योगिक विकासाला महत्व देवून समतोल आर्थिक विकास घडवून आणला आहे.

**विषय विश्लेषण :-**

**१. हरितक्रांतीचे प्रणेते :-**

महाराष्ट्रात हरित क्रांतीचा पाया छत्रपती शाहू महाराजांनी घातला. सार्वजनिक बांधकाम खात्याकडून सर्वेक्षण अहवाल तयार करून राधानगरी धरण त्यांनी बांधले. हे धरण बांधत असताना त्यांनी प्रख्यात व ख्यातनाम अभियंत्याशी त्यांनी सतत संपर्क केला. खजिन्यातील लक्षावधी रुपये शाहू महाराजांनी धरणावर खर्च केले. जागतिक कीर्तीचे तज्ज्ञ सर विश्वेश्वरय्या

बरोबर त्यांनी चर्चा केली. या धरणामुळे कोल्हापूर संस्थानचा कायापालट घडून आला.

**२. बलुतेदारी खालसा केली:-**

बलुतेदारी पध्दतीत व्यवसायावर निर्बंध होते किंवा व्यवसाय बंदी होती. म्हणजे सुताराने सुतारकी, लोहाराने - लोहारकी अशी ठरवून दिलेली कामे करायची. यामुळे एक प्रकारची सामाजिक गुलामगिरी होती. यातून शाहू महाराजांनी २२ फेब्रुवारी १९१८ रोजी एक जाहीरनामा प्रसिध्द करून बलुतेदारी पध्दत बंद केली खासला केली. सर्व बलुते व आलुतेदारांना वाटेल त्या ठिकाणी राहण्याची व वाटेल तो धंदा करण्याची परवानगी दिली.

**३. कोल्हापूर संस्थानचा व्यापारी दृष्टीने विकास :-**

'शाहू छत्रपती स्पिनिंग ॲण्ड विव्हिंग मिलची' स्थापना शाहू महाराजांनी केली. गुळाच्या बाजारपेठेची निर्मिती, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्थांची स्थापना, शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देणे असे उपक्रम त्यांनी आपल्या संस्थानात राबविले व कमालीचे यशस्वी करून दाखविले.

**४. किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्यूटची स्थापना:-**

राजर्षी शाहू महाराजांनी शेतीच्या आधुनिकीकरणासाठी नगदी पिके व तंत्रज्ञानाचा वापर वाढण्यासाठी त्यांनी 'किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्युट'ची स्थापना केली.

**५. गुन्हेगार म्हणून ठरविलेल्या जातींना गुन्हेगारीपासून परावृत्त केले :-**

तत्कालीन समाजात पारधी समाजारख्या अनेक जातींना ब्रिटीश सरकारने गुन्हेगारीचा शिक्का मारला होता. या लोकांना हजेरी द्यावी लागत असे. शाहूंनी हजेरी पध्दत बंद केली. या जाती-जमातींच्या लोकांना एकत्र करून गुन्हेगारीपासून त्यांना परावृत्त केले त्यांना संस्थानात नोकऱ्या दिल्या. त्यांच्यातून पहारेकरी, खजानालदार, रथाचे सारथी निर्माण केले. त्यांना घरे बांधून दिली. वणवण भटकणाऱ्या लोकांच्या राहण्याची सोय केली. राजर्षी शाहू महाराजांमुळे या जमातीला सन्मानाने वागता येऊ लागले.

**६. शिक्षणातून आर्थिक विकास :-**

शाहू काळात मागासलेल्या समाजात एकुण शिक्षणाविषयी मोठी अनास्था होती. उच्चशिक्षण घेऊनही मागसलेल्या समाजातील लोकांना नोकऱ्या मिळत नव्हत्या. म्हणूनच महाराजांनी या बाबीची अचूक नोंद घेवून प्रथम आपल्या राज्यातील नोकऱ्यांत त्यांच्यासाठी ५० टक्के राखीव जागांची सुविधा निर्माण केली. महाराजांचा असा होरा होता की, अशा प्रकारे 'उच्च शिक्षणाची पारितोषिके' मागालेल्या व्यक्तींच्या पदरात पडू शकतात ही जाणीव होताच उच्च शिक्षण घेण्याविषयीची त्यांची उमेद वाढेल व मागासलेल्या समाजाचा शिक्षणातून आर्थिक विकास होईल, असे त्यांचे मत होते.

**७. प्राथमिक शिक्षणावर भर :-**

बहुजन समाज शिकून शहाणा झाल्याशिवाय त्यांचे दारिद्र्य, अज्ञान व अंधश्रध्दा नष्ट होणार नाहीत. हे जाणून शाहूंनी शिक्षणाच्या विशेषतः प्राथमिक शिक्षणाच्या प्रचारावर भर दिला. त्यानुसार त्यांनी १९१७ साली आपल्या संस्थानात सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला आणि तो अंमलात आणला. प्रत्येक खेड्यात प्राथमिक शाळा सुरू केली. प्राथमिक शिक्षणावर या संस्थानात होणारा खर्च मोठा होता.

**८. दुष्काळ व संकटाच्या काळात शेतकऱ्यांना साह्य:-**

छत्रपती शाहू महाराजांच्या काळात 'दोन अस्मानी' संकटे कोसळली या संकटांनी सगळे जनजीवन उद्ध्वस्त होण्याचा प्रसंग ओढावला होता. १८९६-९७ चा भीषण दुष्काळ व १९९८-९९ ची प्लेगची साथ हे होते. महाराजांनी दुष्काळावर मात करण्यासाठी अन्नधान्याची आयात करून स्वस्त धान्याची दुकाने काढली. शेतकऱ्यांना सारामाफी देऊन त्यांच्या गुराढोरांसाठी स्वस्त वैरणचाऱ्यांची व्यवस्था केली. त्यांना रोजगार मिळावा म्हणून रस्ते, विहिरी, तलाव यांची रोजगार हमीची कामे सुरू केली. प्लेगवर मात करण्यासाठी लोकप्रबोधनाची मोहिम त्यांनी उघडली.

**९. निराधार आश्रमाची स्थापना :-**

दुष्काळात अपंग, वृध्द आणि निराधार लोक भूकबळी पडला. त्यावेळी महाराजांनी आपल्या राज्यात ठिकठिकाणी 'निराधार' आश्रम काढले. त्या आश्रमाच्या माध्यमातून १० हजार निराधार लोकांना अन्न वस्त्र देऊन महाराजांनी जीवदान दिले.

**१०. पाळणा घराची स्थापना :-**

काम करणाऱ्या महिला विशेष म्हणजे रस्ते, पुल, तलाव या ठिकाणी काम करणाऱ्या मजूर आई बापांच्या तान्हया मुलांची देखभाल करण्यासाठी कामाच्या ठिकाणी 'पाळणा घरे' उभा केली. आजच्या काळात रोजगार हमी येजना राबविली जाते. त्याची सुरूवात शंभर वर्षापूर्वी छत्रपती शाहू महाराजांनी केलेली होती.

**११. शिष्यवृत्ती वितरण :-**

अस्पृश्य समाजातील विद्यार्थ्यांसाठी महाराजांनी सढळ हाताने आर्थिक मदत सुरू केली. महाराजांचे धाकडे पुत्र प्रिन्स

शिवाजी यांचे दुःखद अपघाती निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ महाराजांनी १९२० साली अस्पृश्य लोकांच्या विद्येच्या उत्तेजनाकरिता १० हजार रुपयांच्या प्रॉमिसरी नोट तयार करून ठेवल्या आणि त्याच्या व्याजातून दरमहा पाच रुपये प्रमाणे आठ शिष्यवृत्त्या सुरू केल्या या शिष्यवृत्तीपैकी तीन शिष्यवृत्त्या अस्पृश्य समाजातील मुलांसाठी होत्या.

**१२. सार्वत्रिक पाटबंधारे धोरण :-**

सन १९०२ साली शाहू महाराजांनी सार्वत्रिक पाटबंधारे धोरण जाहीर केले. त्यासाठी त्यांनी पाटबंधारे खाते निर्माण करून खास 'इरिगेशन ऑफिसर' नेमणूक केली. या खात्यामार्फत नव्या जुन्या विहिरी, छोटे-मोठे तलाव, लहान-मोठे बंधारे यांच्या योजना तातडीने अंमलात आणल्या गेल्या. कोल्हापूरच्या पश्चिमेस सह्याद्रीच्या घाटात भोगावती नदीचा जलप्रवाह अडविणाऱ्या धरणांची महत्वकांक्षी योजना जी पुढे कोल्हापूर जिल्ह्याची वरदायिनी ठरली.

**१३. राजर्षी शाहू महाराज आणि कामगार चळवळ:-**

युरोपातील भांडवलशाही पध्दती प्रमाणे हिंदुस्थानात देखील गिरण्यात कामगाराचे शोषण सुरू केलेले आहे. त्यामुळे गरीब कामगारांची स्थिती अधिकच कष्टमय झाल्याचे शाहू महाराजांनी म्हटले आहे. शाहू महाराजांच्या मते कामगार वर्ग संघटित होवून स्वावलंबी झाला पाहिजे. महाराजांनी म्हटले आहे की, हिंदुस्थानात मुख्य मागासलेला वर्ग हा शेतकऱ्यांचा असून कामगार हा शेतकरी वर्गातूच शहरात आलेला कष्टकरी वर्ग आहे. तो शेतकऱ्याहून वेगळा नाही. कारखान्यात काम करणारे कामगार हे मुळचे शेतकरीच असल्याने कामगार व शेतकरी अशा दोन्ही वर्गाच्या हिताचा एकत्र विचार करणे गरजेचे आहे. शाहू महाराजांचे शेतकरी व कामगार या वर्गासंबंधीचे उपरोक्त विचार मुलभूत स्वरुपाचे होते.

**१४. शेतकी व विज्ञान प्रदर्शने :-**

शाहू महाराजांनी कोल्हापूरात आधुनिक शेती अवजारांचे एक म्युझियम सुरू करण्यात आले. शेतकऱ्यांना सुधारीत अवजारे बी-बियाणे, रासायनिक खते आणि आधुनिक मशागतीच्या पध्दती त्यांचे ज्ञान व प्रशिक्षण देण्यासाठी खास शेती अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यात आल्या. शेतकरी वर्गास आधुनिक शेतीची गोडी लागावी म्हणून महालक्ष्मी रथोत्सव, ज्योतिबा यात्रा, शेतकरी प्रदर्शने भरवली जात. प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतीची आधुनिक साधने, उत्कृष्ट उत्पादनाच्या धान्याचे नमुने, माहितीपत्रके आदींची मांडणी केलेली असते. त्याचबरोबर उत्तम पैदाशीच्या जनावरांचेही प्रदर्शन व विज्ञान प्रदर्शने भरवली जाई.

**१५. पारंपारिक पिकांबरोबर व्यापारी पिकांना चालना:-**

करवीर संस्थानात ऊस, भात, ज्वारी, भुईमुग, कडधान्ये ही नेहमीची पारंपारिक पिके घेतली जात पण याशिवाय चहा, कॉफी, रबर, वेलदोडे, कोको सारखी इथे कधीच न घेतलेली उत्पादने संस्थानात घेतली तर करवीर संस्थानाचा कायापालट होईल असे मत तज्ज्ञांनी मांडले. कोल्हापूरात व्यापारी तत्त्वावर जे चहाचे उत्पादन झाले त्याला पैलवान टी नंबर चार या नावाने तो संस्थानाबाहेर विशेषतः हिंदुस्थानातील राजेरजवाडे यांना पाठवला जावू लागला. हा चहा बडोद्याचे महाराजांना सयाजीराव गायकवाड यांच्या खास आवडीचा चहा बनला.

**१६. उद्योग धंद्यांच्या क्षेत्रातील प्रयोगशीलता :-**

आपल्या संस्थानात शाहू महाराजांनी जपानमधील प्रसिध्द रसायनतज्ज्ञ डी.एस.शाळीग्राम यांची इंडस्ट्रीयल इन्वेस्टर म्हणून नेमणूक केली. जंगल संपत्तीवर आधारीत काही नवे उद्योग संस्थानात सुरू करण्याचा महाराजांचा मानस होता. त्यादृष्टीने शाळीग्रामनी 'सुगंधी औषधी तेल उद्योग' व काष्ठार्क तेल उद्योग या क्षेत्रात औद्योगिक तत्त्वावर काही वनौषधी काष्ठाकीचे यशस्वी उत्पादन सुरू केले. मुंबईत भरलेल्या 'औद्योगिक प्रदर्शनात' कोल्हापूर संस्थानात उत्पादित झालेल्या अशा प्रकारच्या तीन सुगंधीत औषधी तेलांचे नमुने पाठविण्यात आले.

**शोधनिबंधाचे निष्कर्ष :-**

'छत्रपती शाहू महाराजांचे आर्थिक विचार' या शोबनिबंधाचे निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

१. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक विचार आजही उपयुक्त आहेत.

२. कृषी क्षेत्रासंदर्भात मांडलेले विचार आधुनिक असून आजही त्याची अमंलबजावणी झाली तर शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल.

३. राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षण व उद्योगासंदर्भातील विचारामुळे आर्थिक विकासात वाढ झालेली दिसून येते हे विचार प्रगत स्वरुपात आहेत.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. जाधव नरेंद्र (१९८०), महाराष्ट्रातील मानचिन्हे, पुणे मॅजेस्टिक प्रकाशन पुणे.

२. भगत रा.तु. (२०१६), राजर्षी शाहू छत्रपती जीवन व शिक्षण कार्य, कोल्हापूर, रिया पब्लिकेशन्स, पृष्ठ ४१-४२

३. संपादक डॉ.जयसिंगराव पवार, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर

❑❑❑